केस आफ बेंजामिन बट्न याच्यासाठी काम केलेल फेसवेअर टेक्नॉलॉजीची मदत घेण्यात आली होती.

लिजण्ड हा सिनेमा ९ मे रोजी प्रदर्शित होणार आहे.

# दादासाहेब फाळके चित्रपट महोत्सवात 'रंगकर्मी' विजयी!




शशी सुमीत मोशन पिक्चर्सच्या 'रंगकर्मी' या पहिल्याच सिनेमानं इतर अनेक समारंभांमध्ये मानाचं स्थान मिळवत असतानाच अतिशय प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या दादासाहेब फाळके चित्रपट महोत्सवात खास महोत्सव दखल पारितोषिकाचा मान मिळवला आहे.

आपल्या पहिल्याच सिनेमाच्या या यशामुळे आणि जणू सोन्यासारखी पावती मिळाल्यामुळे शशी आणि सुमीत एच. मित्तल यांना खूप आनंद झाला आहे. या जोडीनं 'दिया और बाती हम' आणि 'पुनर्विवाह' या व अशाच काही उत्तम टेलिव्हिजन मालिका दिल्या आहेत. मालिकेप्रमाणे आपल्या पहिल्या सिनेमालाही उदंड प्रतिसाद दिल्याबद्दल त्यांनी प्रेक्षकांचे मनापासून आभार मानले आहेत.

'मनापासून सांगितल्या गेलेल्या कथा या नेहमीच प्रेक्षकांच्या मनाशी संवाद साधतात ही आमची श्रद्धा अधिक दृढ झाली आहे. आम्हाला आमची ओळख देणाऱ्या शहराला आम्ही काहीतरी देऊ शकलो आहोत, असं आम्हाला वाटतं,' असं शशी आणि सुमीत म्हणतात.

09/05/14 MT (Mum)